Recd.
Prasad
04/07/2011

# नोटीस

जा. क्र. २६१ /२०११
हिंजवडी वाहतुक विभाग, पुणे
दिनांक : ३ / ७ /२०११

प्रति,

~~सिमेन्स प्रा. लि.~~
~~फेज~~ I

या नोटीसेद्वारे आपणास सुचित करण्यात येते की, हिंजवडी वाहतुक विभागाअंतर्गत देहूरोड—कात्रज बाह्यवळण रस्त्यावरील वाकड जकात नाका येथे चार ही राईट टर्न बंद दि. २८/८/२०१० पासून बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे इन्फोसिस सर्कल फेज १ ते विप्रो सर्कल फेज २ येथून काळाखडक अंडरपास व वाकड जकात नाका मार्गे वाहतूक यापुर्वी वळविण्यात आली आहे. सायंकाळी १७.०० ते २१.०० वा. इन्फोसिस सर्कल फेज १ ते शिवाजी चौक हिंजवडी मार्गे वाकड जकात नाका व विप्रो सर्कल फेज २ ते मेझानाईन हॉटेल मार्गे मारुंजी रोडने काळाखडक या रस्त्यांवर वाहनांची फार मोठ्या प्रमाणात वाहतुक होते व त्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी होते. सदर रस्त्याने मालवाहतुकीची जड वाहने मोठ्या प्रमाणात येत असल्याने प्रवासी वाहनांना धोका निर्माण झाला आहे. सदरची वाहतुक कोंडी व प्रवासी वाहनांना निर्माण होणारा धोका टाळण्यासाठी.

सकाळी ७.०० ते १०.३० व सायंकाळी १७.०० ते २१.०० वा. आपले कोणत्याही प्रकारचे जड माल वाहतुक करणारे वाहन सदर रोडवर येणार नाही, याची खबरदारी घ्यावी. जर आपले कोणत्याही प्रकारचे जड वाहन रोडवर आल्यास त्यावर कडक योग्य ती कारवाई करण्यात येईल. सदरचे दोन्ही रस्ते हे सकाळी ७.०० ते १०.३० व सायंकाळी १७.०० ते २१.०० वा. पर्यंत जड वाहतुकीसाठी पुर्णपणे बंद करण्यात आलेले आहे याची नोंद घ्यावी.

सही

API 2/7/2011

(आर.बी.नाळे)
सहा. पो. निरीक्षक सो
हिंजवडी वाहतुक विभाग, पुणे शहर